# प्रसिद्धी विभाग


## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला

## दि. २७ जानेवारी २०२० – डॉ. सुरेश नाईक

# चंद्रावर तीन अंतराळवीर पाठवण्याचे काम प्रगतीपथावर

**राजगुरूनगर, दि. २८ (प्रतिनिधी)**



- अवकाश तंत्रज्ञान हे खूप क्लिष्ट आहे. भारताने स्वदेशी बनावटीचे तंत्रज्ञान वापरून चांद्रयान मोहिमेत केलेली प्रगती जगभरात कौतुकाची ठरली. चंद्रावर पाणी शोधण्यासाठी अमेरिका, रशिया, चीन व युरोप आदि देशांत स्पर्धा सुरू असताना भारताने चंद्रावर उपग्रह पाठवून तेथे पाणी असल्याचा शोध लावला आणि जगाला तो मान्य करावा लागला. भारताची 'चांद्रयान मोहीम २' ही बऱ्यापैकी यशस्वी झाली. २०२२ मध्ये भारत चंद्रावर ३ अंतराळवीर पाठवणार असून त्या दृष्टीने काम प्रगतीपथावर असल्याची माहिती इस्रोचे माजी समूह संचालक, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सुरेश नाईक यांनी दिली.

राजगुरूनगर येथे मंगळवारी

### इस्रोचे माजी समूह संचालक डॉ. नाईक यांची माहिती

(दि. २८) 'चांद्रयान मोहिमा' या विषयावर डॉ. नाईक बोलत होते. यावेळी ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. सुरेश नाईक म्हणाले की, भारताकडे अवकाशात उपग्रह सोडण्यासाठी अनेक प्रगत देश येत असून कमी खर्चात उपग्रह सोडणारा देश म्हणून भारत मान्यताप्राप्त आहे. भारताने आतापर्यंत सुमारे ३०० परदेशी उपग्रह अवकाशात सोडले असून एकाच उड्डाणात सुमारे १०४ उपग्रह अवकाशात सोडण्याचा जागतिक पराक्रम केला आहे. नासा या अमेरिकेच्या अवकाश संशोधन संस्थेपेक्षा भारताच्या इस्रो या संस्थेचा खर्च हा खूप कमी असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रभात Wed, 29 January 2020
epaper.eprabhat.net/c/48439913

लोकमत

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात साहेबरावजी बुट्टे-पाटील स्मृती व्याख्यानमाला

# भारताची अवकाश संशोधनातील कामगिरी नेत्रदीपक : स्



लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** अमेरिका, रशिया, चीन या महासत्तांपेक्षा कमी खर्चात आणि कमी वेळेत भारताने चांद्रयान १ व मंगळयान या अवकाश मोहिमा पहिल्याच प्रयत्नात यशस्वी करून नेत्रदीपक कामगिरी केली असल्याचे गौरवोद्गार इस्रोचे माजी समूह संचालक, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सुरेश नाईक यांनी काढले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टे-पाटील स्मृती व्याख्यानमालेत चांद्रयान मोहिमा या विषयावर बोलत होते.

याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, डॉ. रोहिणी राक्षे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. सुरेश नाईक यांनी सांगितले, की अवकाश तंत्रज्ञान खूप क्लिष्ट असून भारताने स्वदेशी बनावटीचे तंत्रज्ञान वापरून चांद्रयान मोहिमेत केलेली प्रगती जगभरात कौतुकाची ठरली आहे. चंद्रावर पाणी शोधण्यासाठी अमेरिका, रशिया, चीन व युरोप आदी देशांत स्पर्धा सुरु असताना भारताने चंद्रावर उपग्रह पाठवून तेथे पाणी असल्याचा शोध लावला आणि जगाला तो मान्य करावा लागला. भारताची 'चांद्रयान मोहीम २' ही बऱ्यापैकी यशस्वी झाल्याचे ते म्हणाले. २०२२ मध्ये भारत चंद्रावर ३ अंतराळवीर पाठविणार असून त्यादृष्टीने प्रगतिपथावर काम सुरु असल्याचे ते म्हणाले.

भारताकडे अवकाशात उपग्रह सोडण्यासाठी अनेक प्रगत देश येत असून कमी खर्चात उपग्रह सोडणारा देश म्हणून भारत मान्यताप्राप्त आहे. भारताने आतापर्यंत सुमारे ३०० परदेशी उपग्रह अवकाशात सोडले असून एकाच उड्डाणात सुमारे १०४ उपग्रह अवकाशात सोडण्याचा जागतिक पराक्रम केला आहे.

'नासा' या अमेरिकेच्या अवकाश संशोधन संस्थेपेक्षा भारताच्या इस्रो या संस्थेचा खर्च हा पाच टक्क्यांपेक्षा कमी असल्याचेही डॉ. सुरेश नाईक यांनी सांगितले. पॉवरपॉइंट प्रेझेंटेशनद्वारे डॉ. नाईक यांनी हा विषय विद्यार्थ्यांना समजावून सांगितला.

Hello Pune Gramin
Page No. 7 Jan 30, 2020
Powered by: erelego.com

# भारताची अवकाश संशोधनातील कामगिरी नेत्रदीपक : सुरेश नाईक



**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** अमेरिका, रशिया, चीन या महासत्तांपेक्षा कमी खर्चात आणि कमी वेळेत भारताने चांद्रयान – १ व मंगळयान या अवकाश मोहिमा पहिल्याच प्रयत्नात यशस्वी करून नेत्रदीपक कामगिरी केली असल्याचे गौरोद्गार इस्रोचे माजी समूह संचालक, जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सुरेश नाईक यांनी काढले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत चांद्रयान मोहिमा या विषयावर बोलत होते.

याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, बाळासाहेब सांडभोर, डॉ. रोहिणी राक्षे, प्राचार्य डॉ.एच.एम. जरे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा.एस.एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. सुरेश नाईक यांनी पुढे सांगितले की, अवकाश तंत्रज्ञान हे खूप क्लिष्ट असून भारताने स्वदेशी बनावटीचे तंत्रज्ञान वापरुन चांद्रयान मोहिमेत केलेली प्रगती जगभरात कौतुकाची ठरली आहे. चंद्रावर पाणी शोधण्यासाठी अमेरिका, रशिया, चीन व युरोप आदि देशांत स्पर्धा सुरू असताना भारताने चंद्रावर उपग्रह पाठवून तेथे पाणी असल्याचा शोध लावला आणि जगाला तो मान्य करावा लागला. भारताची चांद्रयान मोहीम–२ ही बऱ्यापैकी यशस्वी झाल्याचेही ते म्हणाले. २०२२ साली भारत चंद्रावर ३ अंतराळवीर पाठवणार असून त्या दृष्टीने काम प्रगतीपथावर सुरु असल्याचे ते म्हणाले. मंगळयान मोहिमेबद्दलही त्यांनी सविस्तर माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कैलास सोनवणे यांनी केले. परिचय प्रा.शंकर गोपाळे यांनी तर आभार रोहित शेवाळे या विद्यार्थ्याने मानले.

सकाळ

# अवकाश मोहिमेत देशाची कामगिरी मोठी

## शास्त्रज्ञ डॉ. सुरेश नाईक यांचे गौरवोद्‌गार; राजगुरुनगर येथे व्याख्यानमाला

राजगुरुनगर, ता. २१ : अमेरिका, रशिया, चीन या महासत्तांपेक्षा कमी खर्चात आणि कमी वेळेत भारताने चांद्रयान व मंगळयान या अवकाश मोहिमा पहिल्याच प्रयत्नात यशस्वी करून अभिमानास्पद कामगिरी केली असल्याचे गौरवोद्‌गार भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे (इस्रोचे) माजी समूह संचालक, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सुरेश नाईक यांनी काढले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टे-पाटील स्मृती व्याख्यानमालेत चांद्रयान मोहिमा या विषयावर ते बोलत होते. ते म्हणाले, ''भारताने अवघ्या १५ महिन्यांत आणि अवघ्या ४५० कोटी रुपयांत यशस्वी केलेली मंगळयान मोहीम हा विक्रम आहे. तसेच एकाच वेळी १०४ उपग्रह अवकाशात सोडण्याचा जागतिक पराक्रमही भारताने केला आहे. अवकाश मोहिमा तंत्रज्ञानाच्या दृष्टीने कठीण असतानाही भारताने स्वदेशी बनावटीचे तंत्रज्ञान वापरून त्या यशस्वी केल्या. चंद्रावर पाणी शोधण्यासाठी अमेरिका, रशिया, चीन व युरोप इत्यादी देशांत स्पर्धा सुरू असताना भारताने चंद्रावर उपग्रह पाठवून तेथे पाणी असल्याचा शोध ठोस पुराव्यासह लावला आणि जगाला तो मान्य करावा लागला.''

भारताची चांद्रयान-२ मोहीमही बऱ्यापैकी यशस्वी झाली. भारत २०२३ साली चंद्रावर ३ अंतराळवीर पाठवणार असून, त्या दृष्टीने काम प्रगतिपथावर सुरू आहे. भारताचा पीएसएलव्ही अग्निबाण भरवशाचा आणि कमी खर्चाचा आहे. त्यामुळे कमी खर्चात उपग्रह अवकाशात सोडण्यासाठी अनेक प्रगत देश भारताकडे येत आहेत. भारताने आतापर्यंत सुमारे ३०० परदेशी उपग्रह अवकाशात सोडले असल्याचेही डॉ. नाईक यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कैलास सोनवणे यांनी केले. परिचय प्रा. शंकर गोपाळे यांनी करून दिला, तर आभार रोहित शेवाळे याने मानले.

### करिअर करणाऱ्यांसाठी 'स्पेस पार्क' उपयुक्त

पुण्यात सुरेश नाईक यांनी 'स्पेस पार्क' या केंद्राची निर्मिती १५ एकरांमध्ये हिंजवडी येथे केली आहे. या ठिकाणी अग्निबाणाची मॉडेल्स ठेवलेली आहेत. उपग्रहांची माहिती, अंतराळ मोहिमा, खगोलशास्त्र इत्यादी माहिती छोट्या प्रतिकृतींद्वारे देण्यात येते. विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी आणि अवकाश क्षेत्रात करिअर करणाऱ्यांसाठी हा पार्क उपयुक्त असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख